# क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले: एक चिंतन

**प्रा. डॉ. विद्यासागर पुंडलिक सोनकांबळे**
इतिहास विभाग
मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन
जि. जालना

भारतामध्ये इंग्रजांचा प्रवेश म्हणजेच प्रतिगामी विरुद्ध पुरोगामी संघर्षच म्हणावा लागेल इंग्रजानी व्यापारी दृष्टीकोन ठेवून भारतात प्रवेश केला असेलही परंतु या येण्या बरोबर त्यांनी आधुनिक ज्ञान- विज्ञान ही आणले होते म्हणूनच त्यांच्या प्रवेशाने यथील असमानता वादी विचाराने आव्हान निर्माण झाले असे म्हणने वावगे ठरणार नाही कारण या ठिकाणी मनुसहिंतेचा कायदा होता. जातीव्यवस्था पराकोटीची आणि ब्राह्मणी व्यवस्था प्रबळ होती अशा व्यवस्थेच्या विरोधात इग्रजी ज्ञान भारतीयांना प्रथम च मिळाले होते याच ज्ञानातून फुले दाम्पत्याना आधुनिक युगाचा मार्ग मिळाला याचे श्रेय इंग्रजाना द्यावे लागेल. अशा अंधकार युगामध्ये सावित्रीबाई फुले चा उदय झाला ज्या काळात स्त्रिला मनूने कोणतेही अधिकार दिले नव्हते या व्यवस्थेशी दोन हात करण्यासाठी म. ज्योतिबांनी पत्नी सावित्रीबाई ना शिक्षण देऊन क्रांती साठी प्रेरीत केले.

या काळात समाजामध्ये अध्दश्रंध्दा पराकोटीची होती शिक्षण हे विशिष्ट वर्गापुरते मर्यादित होते म्हणून म. फुले यांनी या सर्व व्यवस्थेला बदलण्यासाठी शिक्षण हेच महत्त्वाचे हत्यार आहे हे ओळखून सावित्रीबाई फुले याना शिक्षण देऊन क्रांती साठी उद्वुक्त केले याच विचारातुन मुलीची पहिली शाळा काढली " भारतीय कुटुंब व्यवस्थेचा प्रमुख आधार म्हणजे स्त्रि होय तथापी

स्त्रियांकडे पाहण्याचा कुटुंबाचा आणि समाजाचा दृष्टिकोन फारस चांगला नव्हता असे आपणास म्हणता येणार नाही कुंटुब प्रमुख म्हणून पुरुषाना समाजात जे स्थान होते ते स्थान स्त्रिया ना कधिच प्राप्त करता आल्याचे दिसत नाही. भारतीय संस्कृती पुरुष प्रधान असल्यामुळे स्त्रिला स्वातंत्र्या पासून वंचित रहावे लागले आहे "[१] अशा विषमतावादी काळात म. फुले नी सावित्रीबाई ना समाजकार्यस प्रोत्साहित केले ही फार मोठी क्रांतिकारक घटना होती.

" मुलींना शिक्षण घेण्याची बंदी होती तरी सावित्री लग्नानंतर शिकली ज्योतीबा जवळ पाठ गिरवले तेही जमिनीची पाठी डहाळी ची लेखणी करून'[२] ज्योतिबांनी पत्नीला शिक्षित करून आपण बोलके सुधारक नसून कर्ते सुधारक आहोत हे समाजाला दाखवून दिले आणि पतीच्या हाकेला प्रतिसाद देऊन सावित्रीबाई ने समाजसेवेचे वृत धारण केले. समाजाला शिक्षण मिळाल्या शिवाय विषमतावादी विचाराच्या विरोधी तो उभा राहणार नाही, विज्ञानाच्या मार्गावर जाणार नाही म्हणून फुले दाम्पत्याने शिक्षणाला महत्त्व दिले. जेव्हा ज्योतिबांनी पहिला शाळा उघडली होती तेव्हा शाळेत शिकविण्यासाठी शिक्षक मिळतात तेव्हा ज्योतिबांनी पत्नी सावित्रीबाई ला शिक्षित बनवून शिक्षिका बनविले तेव्हा धर्माच्या ठेकेदारांनी सावित्रीबाई ना अति त्रास दिला त्या डगमगल्या नाही संकटाला तोंड देत समाजकार्य करित राहिल्या. ज्योतिबांना वडिलांचे घराबाहेर काढले तेव्हा सावित्रीबाई ने ज्योतिबांना साथ दिली.

सावित्रीबाई चा शिक्षण रुपी वटवृक्ष अडथळे पार करत वाढतच होता पुढे फातिमा बी सारखी शिक्षीका मिळाली तिच्याच मार्गदर्शनाखाली शिक्षित झालेल्या " मुक्ता साळवे या मातंग समाजातील मुलाने अस्पृश्यांच्या दुखाविषयी निबंध लिहून त्यामध्ये शोषण करणार्या उच्च जातीना प्रश्न विचारून भंबेरी उडवली "[३] सावित्रीबाई नी मुख समाजाला शिक्षित बनविले बोलत केले

म्हणून च मुक्ता सारखी मुलगी बोलू लागली लिहु लागली उपेक्षित समाज ज्ञानी बनू लागला झालेल्या अन्यायाचा जाब विचारू लागला एकंदरीत ज्योतिबांनी शिक्षणाचे रोपटे लावले तर सावित्रीबाई ने या रोपट्यांवर रोपट्यात रूपांतर केले.

सावित्रीबाई काव्य फुले या काव्यसंग्रहात म्हणतात " शुद्रांना सागंण्याजोगा शिक्षण मार्ग हा, शिक्षणाने मनुषत्व, पशुत्व होते पहा"[४] सावित्रीबाई शुद्र- अस्पृश्यांना समानतेच्या वाटेवर आणण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाची गरज आहे हे सागींतले पशूचे जिने ज्यांच्या वाट्याला आले ते शिक्षणामुळे दुर होईल म्हणून सावित्रीबाई विद्याला महत्त्व देतात

सावित्रीबाई ने शाळा काढून वचींत घटकांना पुढे घेऊन जात असताना समाजात चालत आलेल्या अनिष्ट रूढी परंपरा व स्त्रियांच्या होणार्या शोषणाकडे लक्ष दिले त्याकाळी स्त्रि जिवन पशुतुल्य होते बालविवाह प्रथा अस्तित्वात असल्याने व विधवांना पुनर्विवाह करण्यास धर्माने बंदी घातली असल्याने स्त्रि जिवन पशुतुल्य होते कुमारी स्त्रिया विधवा झाल्यास अनैतिक मार्गाकडे वळत जर गर्भधारणा झाली तर समाजाच्या छळाला तिला सामोरे जावे लागे अशा स्त्रिया ना सावित्रीबाई ने बालहत्या प्रतिबंध गृह ही संस्था काढून आधार दिला '१८८४ पर्यंत त्यांनी या बालहत्या प्रतिबंध गृहात ३५ बालविधवांची बाळंतपण पार पाडली होती "५ अशाच अनैतिकता संबधाने गर्भधारणा झालेल्या काशीबाई नी जिवन संपविण्याचे ठरवले तेव्हा सावित्रीबाई ने तिला आधार देऊन तिचे बाळंतपण केले व जो मुलगा झाला त्यांचे नाव यशवंत ठेवले त्यास दत्तक घेतले येवढेच नाही तर आपल्या संपत्ती चा काही वाटा ही त्याच्या नावाने केला ही फार मोठी क्रांतिकारक घटना च होती.

## सारांश

सावित्रीबाई फुलेनी समाजसेवेचे वृत हाती घेतले होते यामध्ये त्यांनी जे कार्य केले ते क्रांतिकारी होते. स्वत शिक्षण घेतले शिक्षिका होऊन मुलिंना शिक्षण घेण्यासाठी शाळा काढली हे त्याकाळी फार कठीण कार्य होते पण सावित्रीबाई ने हे काम नेटाने पुढे नेले म्हणून त्यांना भारतातील आद्य शिक्षिका म्हणतात. त्याच बरोबर अस्पृश्यांसाठी काढलेल्या शाळा, विधवांना दिलेला आश्रय, वंचितांना दुखिताना समानतेच्या वाटेवर आणण्याचे महान कार्य सावित्रीबाई ने केले.

## सदंर्भ

१) गवळी पी. ए. -मराठ्यांचा इतिहास ( प्र. आ. १९९८) कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद पृ. १९४

२) मुंबई मिनाक्षी- फुले आंबेडकरी स्त्रि चळवळ (१४-१०-२००२) समता प्रकाशन नागपूर पृ. ३२

३) परदेशी प्रतिमा, काळे दिपक (दु.आ.२८-११-२००७) जिजाऊ प्रकाशन पुणे पृ. १२

४) डॉ माळी मा. गो. -सावित्रीबाई फुले समग्र वाड. मय(च.आ.२००६) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई . पृ १०

५) गाठाळ एस. एच. भारतीय इतिहासातील स्त्रि व स्त्रि जिवन ( प. आ. २०१७) कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद. पृ१०७